# शालेय परिपाठ

activeguruji.com

16~ डिसेंबर | * परिपाठ तयारीसाठी उपयोगी PDF* | शालेय परिपाठ

## आजचे पंचांग

आज वार- शुक्रवार दिनांक- 16/12/2022

मिती-मार्गशीर्ष कृष्ण अष्टमी शके-1944

## सुविचार

**"अचूकता पाहिजे तर सराव महत्वाचा."**

## दिनविशेष

**16 डिसेंबर-राष्ट्रीय पत्रकार दिन**

ठळक घटना आणि घडामोडी

चौदावे शतक-

1392- जपानी सम्राट गो-कामेयामाने पदत्याग केला. गो-कोमात्सु सम्राटपदी.

पंधरावे शतक-

1497 -वास्को द गामाने केप ऑफ गुड होपला वळसा घातला.

## सतरावे शतक-

1639- इंग्लंडच्या संसदेने नागरी हक्कनामा प्रस्तुत केला.

## अठरावे शतक-

1773- अमेरिकन क्रांती-बॉस्टन टी पार्टी - टी ऍक्टच्या विरोधात सन्स ऑफ लिबर्टीच्या सदस्यांनी मॉहॉक वेश धारण करून बॉस्टनच्या बंदरात चहाची खोकी फेकली.

## एकोणिसावे शतक-

1838- ब्लड रिव्हरची लढाई - दक्षिण आफ्रिकेत क्वाझुलु, नाताल येथे ऍँड्रीझ प्रिटोरियसच्या नेतृत्वाखाली फूरट्रेक्कर आणि दाम्बुझा(न्झोबो) व न्देला कासोम्पिसी या झुलु ईम्पी सरदारांच्या सैन्यात घनघोर युद्ध. झुलुंच्या भाले आणि बाणांविरुद्ध बोअर बंदुका. तीन फूरट्रेक्कर जखमी 3,000 झुलु ठार.

1864- अमेरिकन यादवी युद्ध - मेजर जनरल जॉर्ज एच. थॉमसच्या युनियन सैन्याने लेफ्टनंट जनरल जॉन बेल हूडच्या कॉन्फेडरेट आर्मी ऑफ टेनेसीला हरविले.

## विसावे शतक-

1903 –मुंबईतील ताजमहाल पॅलेस हॉटेल ग्राहकांसाठी खुले करण्यात आले.

1922- वॉर्सोमध्ये पोलंडचा अध्यक्ष गेब्रियेल नारुतोविझचा खून.

1932 - 'प्रभात'चा 'मायामच्छिंद्र' हा चित्रपट प्रदर्शित झाला.

1942- ज्यूंचे शिरकाण - हाईनरिक हिमलरने रोमा(जिप्सी) लोकांना कत्तलीसाठी ऑश्विझला पाठविले.

1944- दुसरे महायुद्ध-बॅटल ऑफ द बल्ज - बेल्जियमच्या आर्देनेस प्रदेशात जनरल ड्वाइट डी. आयझेनहोवर आणि फील्ड मार्शल गेर्ड फोन रुंड्स्टेटच्या सैन्यात लढाई.

1946- लेओन ब्लुम फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

1946 - थायलँडला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

1957- ई.ई.चुंदरीगरने राजीनामा दिल्यावर सर फिरोजखान नून पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी.

1971 - भारत पाक युद्ध – पाक सैन्याची शरणागती, बांगलादेशची निर्मिती

1971- बांगलादेश मुक्ति युद्ध - बांगलादेश विजय दिन. पाकिस्तानी फौजेने मित्रो बाहिनी समोर सपशेल शरणागति पत्करली.

1985 - कल्पक्कम येथील 'इंदिरा गांधी अणूसंशोधन केंद्रातील (IGCAR) प्रायोगिक 'फास्ट ब्रीडर रिॲक्टर' राष्ट्राला समर्पित

1991 - पुर्वीच्या सोविएत संघराज्यातुन (USSR) फुटून कझाकस्तान हा स्वतंत्र देश झाला.

1998- ऑपरेशन डेझर्ट फॉक्स - अमेरिका व युनायटेड किंग्डमने इराकवर बॉंबफेक केली.

## एकविसावे शतक

2012- दिल्लीत एका तरुणीवर बसमध्ये निर्घृण सामूहिक बलात्कार व अत्याचार. तरुणीचा मृत्यू झाल्यावर सरकारने बलात्कार कायदा बदलला.

2014- पाकिस्तानी तालिबानने पेशावरमधील एक लष्करी शाळेवर हल्ला चढवून 132 विद्यार्थ्यांना ठार मारले.

**जन्म-**

1485- अरागॉनची कॅथेरीन, इंग्लंडची राणी.

1770- लुडविग फान बीथोव्हेन, जर्मन संगीतज्ञ.

1775- जेन ऑस्टेन, ब्रिटीश लेखक.

1790- लिओपोल्ड पहिला, बेल्जियमचा राजा.

1882- सर जॅक हॉब्स, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.

1888- अलेक्झांडर, युगोस्लाव्हियाचा राजा.

1917- सर आर्थर सी. क्लार्क, ब्रिटीश लेखक.

1926- बबन प्रभू, प्रहसन अभिनेता.

1933- डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे अभ्यासक.

1952- जोएल गार्नर, वेस्ट ईंडीझचा क्रिकेट खेळाडू.

**मृत्यू-**

1515- अफोन्सो दि आल्बुकर्क, पोर्तुगालचा भ्रमंत.

1922- गेब्रियेल नारुतोविझ, पोलंडचा पहिला राष्ट्राध्यक्ष.

1960- चिंतामण गणेश कर्वे, मराठी कोशकार व लेखक, महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, शास्त्रीय परिभाषा कोश यांचे संपादक.

2004- लक्ष्मीकांत बेर्डे, अभिनेता.




जनगणमन अधिनायक जय हे

भारत भाग्य-विधाता।

पंजाब, सिंधू, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग,

विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,

उच्छल जलधितरंग,

तव शुभ नामे जागे तव शुभ आशिस मागे,

गाहे तव जयगाथा,

जनगण मंगलदायक जय हे,

भारत भाग्य-विधाता।

जय हे, जय हे, जय हे,

जय जय जय, जय हे॥

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे.

सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि
विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता
माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन.

मी माझ्या पालकांचा, गुरूजनांचा
आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव
यांच्याशी निष्ठा राखण्याची
मी प्रतिज्ञा करीत आहे.
त्यांचे कल्याण आणि
त्यांची समृद्धी ह्यांतच माझे
सौख्य सामावले आहे.

जय हिंद




केशवा, माधवा, तुझ्या नामात रे गोडवा

तुझ्यासारखा तूच देवा, तुला कुणाचा नाही हेवा
वेळोवेळी संकटातुनी तारिशी मानवा

वेडा होऊन भक्तीसाठी, गोपगड्यांसह यमुनाकाठी
नंदाघरच्या गाई हाकिशी गोकुळी यादवा

वीर धनुर्धर पार्थासाठी, चक्र सुदर्शन घेऊन हाती
रथ हाकुनिया पांडवांचा पळविशी कौरवा




## आता उठवू सारे रान

आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण !

किसान मजूर उठतील
कंबर लढण्या कसतील
एकजुटीची मशाल घेउनी पेटवतिल हे रान !

कोण आम्हा अडवील
कोण आम्हा रडवील
अडवणूक करणाऱ्यांची उडवू दाणादाण !

शेतकऱ्यांची फौज निघे
हातात त्यांच्या बेडी पडे
तिरंगी झेंडे घेती, गाती स्वातंत्र्याचे गान !

पडून ना राहू आता
खाऊ ना आता लाथा
शेतकरी अन् कामकरी मांडणार हो ठाण !



# पसायदान



आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज द्यावे । पसायदान हें ॥

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचें ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरूखी । अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ॥

येथ ह्मणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥

## मराठी बातम्या

### महाराष्ट्रातील तब्बल दीड लाख तरुणांना नोकरी मिळणार, शिंदे-फडणवीस सरकारचं मोठं गिफ्ट

मुंबई : महाराष्ट्र सरकारचा हिंदुजा ग्रुपसोबत आज सामंजस्य करार झालाय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि हिंदुजा ग्रुपचे मुख्य जी पी हिंदुजा यांच्यासोबत आज बैठकीदरम्यान आज हा करार झाला. या करारानुसार हिंदुजा ग्रुप मुंबई आणि महाराष्टात एकूण 12 क्षेत्रात गुंतवणूक करणार आहे. ही गुंतवणूक तब्बल 35 हजार कोटी रुपयांची आहे. तर या गुंतवणुकीतून दीड लाख नागरिकांना रोजगार मिळणार आहे.

# बोधकथा

## सवय

एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायला प्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्यास मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई.

अखेर एके दिवशी पोपटाला संधी चालून आली. त्यार माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्याच्या हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्या बाहेर निघून गेला.

पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते.

पिंज-यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन, वारा, पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

तात्पर्य: जास्त काळ पारतंत्र्यात(गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरून राहते. मग परक्याची भाषा, संस्कृतीच आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वातंत्र्य टिकवण्यासाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्या संस्कृतीचे चांगले काही घेताना आपल्या संस्कृतीचे विस्मरण होऊ न देणे हाच खरा शहाणपणा.

**************************************ok*******************************************


घरचा अभ्यास व परिपाठ पाहण्यासाठी active guruji वेबसाईटला

माझा ऑनलाईन अभ्यास

